**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# रानभाजी महोत्सव तरुण पिढीसाठी आरोग्य मंत्र : माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर

ग्रामोध्दार वृत्तसेवा एस.मोहिते-

पाटण : पाटण तालुका हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला तालुका आहे. येथील परिसर निसर्गसंपन्न दऱ्या खोऱ्यांनी नटलेला आहे. येथील दाट जंगलात विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींच्यासह विविध प्रकारच्या रानभाज्या सुद्धा खूप प्रमाणात आढळतात. मात्र आधुनिक जीवनशैलीमुळे आणि पाश्चिमात्य अन्नसंस्कृतीच्या प्रभावामुळे आजच्या तरुण पिढीस या रानभाज्यांचे ज्ञान कमी होत चालले आहे. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, युवक मंडळे, आणि स्वयंसेवी संस्था यांनी पुढाकार घेऊन रानभाजी महोत्सवाचे आयोजन करावे आणि पुढच्या पिढीसाठी हा नैसर्गिक वारसा जपावा असे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंहजी पाटणकर यांनी बी.डी. कॉलेज पाटण येथे आयोजित रानभाज्या महोत्सव उद्घाटन प्रसंगी सांगितले

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे वनस्पतीशास्त्र विभाग व रोटरी क्लब पाटण यांचे संयुक्त विद्यमाने रानभाजी व तृणधान्य महोत्सव आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. यावेळो कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक, युवा नेत श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण प्राचार्य डॉ शिरीष पवार, प्रा. डॉ बी व्ही जाधव, रो. किशोर तुळसनकर, प्रा डॉ हेमलता काटे, प्राचार्य चेतन सावंत, प्रा. एस.ए.गायकवाड याची प्रमुख उपस्थिती होती.



रानभाज्या महोत्सव पाहणी करताना याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण आदी. तर यावेळी मार्गदर्शन करताना माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर पुढे म्हणाले आपल्याकडे सह्याद्रीच्या दर्याखोऱ्यात उगवणाऱ्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या आहेत त्या आपल्या आरोग्यासाठी उपयोगी आहेत. ज्यांना याची माहिती आहे त्यांनी हा वसा पुढच्या पिढीला दिला पाहिजे. या भाज्या मध्ये भरपूर प्रमाणात लोह, कॅल्शियम, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे आढळतात. विशेषतः आजच्या धकाधकीच्या जीवनात रानभाज्या हे नैसर्गिक मडिटॉक्स

(पान ६ पहा)